राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४

Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्रं.विकापु/आस्था-१/सावेआ/२०२१/ 1027 दिनांक : 25 FEB 2021

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित पदविका संस्था

**विषय** - राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांतील अधिव्याख्यात्यांना ग्रेड पे रु.५०००/- ऐवजी ग्रेड पे रु.५४००/- लागू करण्याबाबत.

संदर्भ:- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शानिक्र.सावेआ-१११९/प्र.क्र.४४/१९/तांशि-२ दिनांक ११/०९/२०१९(पदविका)
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शानिक्र.संकीर्ण १११९/(६४/२०)/तांशि-२ दिनांक १६/१२/२०२०
३. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/आस्था/७वेआ/२०२०/२७५ दिनांक २४/१२/२०२०
४. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/आस्था/७ वेआ/२०२१/९९ दिनांक २३/०२/२०२१

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिनांक ०४/०१/२०१६ च्या अधिसूचनेन्वये केलेल्या खुलाश्यानुसार सदर्भ क्र.२ अन्वये वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५०००/- ऐवजी वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४००/- लागू करण्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

तदनुषंगाने संदर्भ क्र.३ अन्वये, या कार्यालयांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका संस्थांनी केलेली पात्र अध्यापकांची सातव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती ही अचुक व शासन निर्णयातील मुद्दे/तरतूदीनुसार केलेली असल्याबाबत पडताळणी करुन त्यानुसार वेतननिश्चिती प्रपत्र या कार्यालयामार्फत प्रमाणित करणेबाबत आदेशित केलेले असल्यामुळे त्याबाबत या कार्यालयांमार्फतही कार्यवाही चालू आहे.

तथापि, ब-याच संस्थांकडून अशा प्रकारची वेतननिश्चिती प्रकरणे संचालनालयांस सादर केली जात असलेबाबत संदर्भ क्र.४ अन्वये वरिष्ठ कार्यालयाने कळविलेले आहे. सबब या पत्राव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दि.०१/०१/२००६ पासून मंजूर करण्यात आलेल्या ग्रेड वेतन रु.५४००/- च्या अनुषंगाने कोणतेही प्रकरण **संचालनालयांस सादर न करता ते या कार्यालयांस सादर करावे.**

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२.संगणक विभाग,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

C:\Users\Admin\Desktop\7 th pay for Class I\Office Order.docx